# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अमरावती जिल्हयातील पापळ विकास आराखड्यांतर्गत पूर्ण झालेल्या इमारतीची विद्युतीकरणाची कामे झालेली नसल्याबाबत

**(१) ५६८४ (०९-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील पापळ विकास आराखड्यांतर्गत पूर्ण झालेल्या इमारतीची विद्युतीकरणाची कामे झालेली नसल्याने ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पापळ विकास आराखड्यातर्गत पूर्ण झालेल्या इमारती व चांदूर रेल्वे धामणगांव रेल्वे व नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील पूर्ण झालेली तलाठी कार्यालये ठिकाणी तातडीने विद्युत जोडणीची कामे पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी अधिक्षक अभियंता, सां.बा.विद्युत विभाग, अमरावती यांच्याकडे दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,

(२) होय.

(३) १४१ कामापैकी ९४ कामांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे व उर्वरीत काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील बहादूरशेख ते शासकीय विश्रामगृह कापसाळ येथे उड्डाणपुल बांधण्याबाबत**

**(२) ७९८५ (१०-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील बहादूरशेख ते शासकीय विश्रामगृह कापसाळ या दरम्यान ४ किलोमीटर लांबीचा उडडाणपुल विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलाच्या कामाकरिता किती खर्च अपेक्षित आहे तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर उड्डाणपुलाच्या कामास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्री महोदय, रस्ते वाहतूक मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०६/२०१५ रोजी मुंबई येथे बैठक झाली. सदर बैठकीमध्ये चर्चा होऊन मा.मंत्री महोदयांनी सहापदरी उड्डाणपूलाबाबत शक्याशक्यता अहवाल तयार करणेबाबतचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महामार्गाच्या चौपदरीकरणाचा आराखडा तयार करणाऱ्या व्हायंटस सोल्युशन कं., हरयाणा यांना अहवाल तयार करणेबाबत कळविणेत आलेले आहे. शक्याशक्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतरच विषयांकित उड्डाणपूलाच्या मंजूरीबाबत पुढील कार्यवाही केंद्र शासनातर्फे करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगोला तालुक्यातील मिरज - पंढरपूर राज्य महामार्गावरील वाटंबरे येथील पुलाची झालेली दुरावस्था**

**(३) ९९७३ (१९-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला तालुक्यातील मिरज-पंढरपूर राज्य महामार्गावरील वाटंबरे येथील पुलाची दुरावस्था झाली असून पुलावर जागोजागी खड्डे पडले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पूलाची दुरावस्था दूर करुन तातडीने दुरुस्ती करावी अशी वाहनधारकांकडून व सामाजिक कार्यकत्यांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

सद्यस्थितीत सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.९५३-ब असून वाटंबरे येथील पुलावरील वाहनमार्गीकेमधील सर्व खड्डे भरण्यात आलेले आहे.

(२) व (३) सदर ठिकाणी नव्याने पूल बांधण्याचे काम केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सन २०१५-२०१६ च्या वार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ट असून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे सोलापूर महामार्गावरील हडपसर कवडीपाट टोलनाक्याच्या दरम्यानच्या रुंदीकरणाचे काम दोन वर्षापासून रखडलेले असल्याबाबत**

**(४) १०८९४ (१०-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे सोलापूर महामार्गावरील हडपसर कवडीपाट टोलनाक्याच्या रुंदीकरणाचे काम दोन वर्षापासून रखडलेले असल्याचे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाची मुदत संपून गेलेली असतानाही हे काम सुरु असून विविध भागातील प्रशासकीय उदासीनता या विभागाचा असमन्वय व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामाच्या नियोजनाच्या अभावामुळे दोन वर्षापासून हे काम रेंगाळत चालले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढती वाहतूक अरुंद रस्ता वाहतूक नियंत्रणाच्या अभावामुळे काही वर्षापासून नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे संथ गतीने होत असलेल्या रुंदीकरणामुळे नागरीक मेटाकुटीला आले आहेत त्यामुळे शासनाने हे काम लवकरात लवकर व्हावे म्हणून काही दखल घेतली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधिन कामांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींचा निपटारा करुन डिसेंबर-२०१५ अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्यांचे स्थलांतरण, विद्युत वाहिन्यांचे स्थलांतरण, झोपडपट्टीचे पुनर्वसन, आकाशवाणी कंपाऊंड वॉल व भूसंपादन क्षेत्रामधील अडचणी व मंदिरे हटविणे ही विलंबाची सर्वसाधारण कारणे आहेत.

---

**वाडा ते ठाणे या मार्गावरील वंजारपट्टी फ्लायओव्हरचे काम**
**अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५) १३१०९ (०४-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा ते ठाणे या मार्गावरील ७९५ मीटर लांबीच्या वंजारपट्टी फ्लायओव्हरचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फ्लायओव्हरचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हे काम किती कालावधीत पूर्ण होऊन सदर फ्लायओव्हरचे केव्हापर्यंत कार्यान्वित करण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) वंजारपट्टी उड्डाणपुलाचे मूळ आराखड्यात नागरीकांच्या मागणीनुसार दोन अतिरिक्त मार्गीकांचा समावेश करण्यात आला. या अतिरिक्त मार्गिकांचे काम सुरु असून मूळ उड्डाणपूलाचे काम पूर्ण झाले आहे.

(३) सदर उड्डाणपुलाचे अतिरिक्त मार्गिकांसह काम माहे ऑक्टोबर, २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**हिंगणा तालुक्यातील (जि.नागपूर) येथील पोलीस ठाण्याची इमारत बांधण्याचे**
**काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) १४८५४ (१०-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा तालुक्यातील (जि.नागपूर) येथील पोलीस ठाण्याची इमारत बांधण्याकरिता ८० लाखाचा निधी मंजूर झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागामुळे निविदा प्रक्रियाच्या कामासही विलंब झाल्याने मागील ५ महिन्यापासून बांधकाम प्रलंबित असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून सदर निविदा लवकरात लवकर काढण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
उक्त पोलीस ठाण्याचे इमारत बांधकामास गृह विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून यानुषंगाने पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रा), नागपूर यांनी रुपये ८३.९३ लक्षचा धनादेश दिनांक २३/६/२०१४ ला कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.३, नागपूर विभागाकडे जमा केलेला आहे.
(२) नाही.
उपरोक्त कामास निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक १६/२/२०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.
(३) शासनाकडून नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून उक्त काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील महामार्ग क्र.७ वरील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(७) १५४८७ (१०-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील नागपूर-हैद्राबाद महामार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याने नादुरूस्तीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असल्याने अनेक नागरिकांना जीव गमवावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आलेले असून रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे कुठलेही अपघात झाला नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(२) व (३) सदर रस्त्याच्या कि.मी. ९४.०० ते कि.मी. १२३.०० चे काम या कामाचे कंत्राटदार यांनी पुर्ण न केल्याने या कामाचा करारनामा मुदतपुर्व संपुष्टात आणण्याची कार्यवाही सुरु असल्याचे तसेच उर्वरीत कामांची निविदा मागविण्यात आलेल्या असून काम माहे डिसेंबर पर्यंत सुरु होणे अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

---

**धुळे तालुक्यातील आर्वी ते शिरुड आणि मोराणे ते गोंदूर (दुसरा टप्पा) या दोन्ही रस्त्यांच्या कामांना सुरुवात झालेली नसल्याबाबत**

**(८) १६४८० (०३-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील आर्वी ते शिरुड आणि मोराणे ते गोंदूर (दुसरा टप्पा) या दोन्ही रस्त्यांना सी आर एफ अंतर्गत मंजूरी मिळाली असून अद्याप सदर कामांना सुरुवात झालेली नाही असे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे महत्वाचे रस्ते लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) शासनाच्या विहित पध्दतीने सीआरएफ योजनेतून मंजूर असलेल्या सदर कामांची निविदा निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून निविदा निश्चितीनंतर तात्काळ कामे सुरु करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील कशेडी त वेरळ या टप्प्यातील भूसंपादनाबाबत**

**(९) १६९२२ (३०-०७-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी कशेडी त वेरळ या टप्प्यासाठी भूसंपादन करण्यास सुरुवात झाली असून त्यासाठी शेतक-यांना विश्वासात घेतले जावे व गरीब शेतक-यांना योग्य मोबदला मिळावा असे निवेदन मा.पर्यावरण मंत्री यांना स्थानिकांनी दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतक-यांच्या जमिनीचे संपादन शासनाने केले आहे त्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) सदरील भुसंपादन राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ नुसार करण्यात येत असून कशेडी ते वेरळ टप्प्याचे संयुक्त मोजणीचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. जमिनीच्या मावेजाबाबत कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायगांव बाजार, जि.नांदेड येथील राजगडनगर नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(१०) १६९३९ (३१-०७-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव बाजार, जि.नांदेड येथील राजगडनगर हे पुनर्वसित गांव अस्तित्वात येऊन २५ वर्षे झाली परंतु गावाला जाणाऱ्या रस्त्यांवरील नदीवर पुल मात्र अद्याप झाला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात कोकलेगावाच्या बाजूने नदी वाहते या नदीचे पाणी गावात शिरून गावकऱ्यांचे नुकसान होत आहे हे पाहता शासनाने पूरग्रस्त लोकांचे सन १९९० मध्ये २ कि.मी. अंतरावर पुनर्वसन केले आणि राजगडनगर असे महसूली गांव म्हणून अंमलात आणले या गांवचे अद्यापही सर्व व्यवहार हे कोकलेगावशी जोडलेले असल्याने येथील लोकांना वारंवार कामासाठी दररोज कोकलेगावला जावे लागते परंतु या दोन्ही गावांतील अंतर हे २ कि.मी. असून मध्ये नदी असूनही ये-जा करण्यास पुल नसल्याने पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय होते हे पाहता शासनाने उपरोक्त प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५)** :(१) हो, हे खरे आहे.
(२) कोकलगोव हे हंगरगा हा रस्ता ग्रामीण मार्ग ३५ असून त्या मार्गावर राजगडनगर हे गाव आहे. कोकलेगाव ते राजगडनगर हे २.०० किमी अंतर असून सदर रस्त्यावर पुल बांधण्यासाठी अंदाजे रु.२०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.
(३) मंजूरी व निधीच्या उपलबधतेनुसार काम हाती घेण्यात येणार आहे.

---

**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एसएस्सी कम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

**(११) १७०४२ (३०-०७-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : तारांकित प्रश्न क्रमांक ९९४३ ला दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भातः** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत एसएस्सी, कम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमांचा

समावेश करण्याच्या विचाराधीन बाबीवर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) तसेच निर्णय घेण्यास होणा-या विलंबामुळे मागासवर्गातील सुधारित अभ्यासक्रमातंर्गत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मिळणा-या शिष्यवृत्ती पासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-१२-२०१५) :**(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सुधारित अभ्यासक्रम अद्याप लागू करण्यात आलेले नाहीत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) विजाभज, इमाव व विशेष मागास प्रवर्गासाठी असलेल्या सध्याच्या योजनेत सदर अभ्यासक्रमांचा समावेश नाही. त्यामुळे एमएसस्सी कॉम्प्युटर सारख्या नवीन अभ्यासक्रमांचा या योजनेत समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हदगाव तालुक्यातील तामसा रस्त्यालगत असलेल्या इरिगेशन कार्यालय ते हुलकणी तांडा या अतिदुर्गम भागाच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१२) १७११९ (०३-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव तालुक्यातील तामसा रस्त्यालगत असलेल्या इरिगेशन कार्यालय ते हुलकणी तांडा या अतिदुर्गम भागाच्या विकासाकरीता शासनाने रस्त्याच्या कामाकरीता ९० लाख रुपये मंजूर केले होते. या कामाच्या गुत्तेदाराने डांबरीकरणाचे काम असतानाही डांबराचे प्रमाण अत्यल्प करुन काम निकृष्ट पध्दतीने उरकले असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामाची शासानाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
प्रश्नाधीन इरिगेशन कार्यालय ते हुलकणी तांडा या ग्रामीण रस्त्याचे सुधारण्याचे काम सन २०१४-१५ अर्थसंकल्पात रु.९०.०० लक्ष किंमतीस मंजूर असून सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर कडून करण्यात आले आहे. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकानुसार व

विनिर्देशानुसार करण्यात आले आहे. काम चालू असताना कामाची गुणवत्ता, दर्जा टिकवून ठेवण्यासाठी बाधकाम साहित्याच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाच्या दुरुस्तीकरीता गट ब व क अंतर्गत प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(१३) १७२६२ (१४-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाच्या दुरुस्तीकरीता गट ब व क अंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता मान्यता देण्यासाठी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गट ब व क अंतर्गतच्या सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुध्दा लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) शासनाने सन २०१४-१५ या वर्षासाठी रु.१६२६.९४ लक्ष रकमेचा दायित्वाच्या कामांचा मंजुर केला आहे. या वर्षासाठी वाशिम जिल्ह्यासाठी गट ब व क साठी वितरित केलेले अनुदान रु.७२०.२८ लक्ष इतके होते. त्यामुळे नवीन कामे मंजुर करण्यास वाव नव्हता.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेडशी-मुंगळा-डोंगरकिन्ही (जि.वाशिम) या प्रमुख जिल्हा मार्गावर सुधारणा करण्याबाबत**

**(१४) १७२६८ (१९-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेडशी-मुंगळा-डोंगरकिन्ही (जि.वाशिम) या प्रमुख जिल्हा मार्गावर सन २०११-१२ च्या गट ब कार्यक्रमात कि.मी.६/०० ते १०/०० ची सुधारणा व २०१३ च्या गट ब कार्यक्रमात कि.मी. ७/४०० ते १५/०० ची सुधारणा करणे शासनाने मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच रस्त्यावर माहे जुलै, २०१३ च्या अंदाजपत्रकात कि.मी. १,२,४,६/०० ते ७/४०० ची सुधारणा करणे कामास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गट ब व अंदाजपत्रकिय कामेपुर्ण झाली आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) सन २०११-१२ मध्ये रस्ते देखभाल दुरुस्ती कार्यक्रमात सदरचे काम मंजूर नाही. सन २०१२-१३ च्या गट ब कार्यक्रमात कि.मी. ७/४०० ते १५/०० ची सुधारणा करणे या कामास रु.१९५ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(२) होय,

सदर काम अर्थसंकल्पात समाविष्ट असून कामाची किंमत रु.१४५ लक्ष इतकी आहे.

(३) १) गट ब अंतर्गत मंजूर असलेले कि.मी. ७/४०० ते १५/०० मधील काम प्रगतीपथावर आहे.

२) कि.मी. १,२,४ व ६/०० ते ७/४०० ह्या लांबीतील अर्थसंकल्पात समाविष्ट काम पूर्ण झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा टोल ते आंबेत रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) १७४३२ (०४-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा टोल ते आंबेत असा १२ कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम दिले आहे, परंतु या कामासाठी निधी मिळत नसल्याने हे काम ठप्प झाले असल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१५) :**(१) नाही.

रस्त्यंचे डांबरी पृष्टभागावरील खड्डे खडी व डांबराने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार (जि.ठाणे) येथील पूर्व पश्चिम जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाबाबत**

**(१६) १७८४८ (१४-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.ठाणे) येथील पूर्व पश्चिम जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलावरून उतरण्यासाठी दोन्ही बाजूला जिन्याची सोय नसल्याने नागरिकांना रेल्वे रुळ ओलांडावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार शहर रेल्वे फाटक क्रमांक ४० येथील सार्व. बांधकाम विभागाने पूर्व-पश्चिम जोडणारा सदरहू उड्डाणपूल बांधण्यात आला असून मागील सहा-सात वर्षापासून रखडलेला हा ब्रिज माहे २६ जानेवारी रोजी वाहतुकीसाठी खुला झाला असून या ब्रीजवर दोन्ही बाजूने पादचाऱ्यांसाठी चालण्याची सोय असून पदपथही बांधला आहे मात्र या उड्डाणपुलावरून खाली उतरण्यासाठी जिने नसल्याने नागरिकांना रेल्वे रूळ ओलांडून जाण्याशिवाय अन्य पर्यायच नसल्याने जेष्ठ नागरिक, महिला, शाळकरी विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून रेल्वेरुळ ओलांडून पूर्व-पश्चिमेला ये-जा करावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उड्डाण पूलावरुन खाली उतरण्यासाठी बांधावयाच्या जिन्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नाही. वसई-विरार महानगरपालिकेस आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली आहे. जागा उपलब्ध होताच जिन्याचे बांधकाम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**कन्नड (जि.औरंगाबाद ) तालुक्यातील महामार्गाला जोडणाऱ्या चिंचोली लिंबाची ते सावखेडा रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१७) १८०६५ (३०-०७-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील महामार्गाला जोडणाऱ्या चिंचोली लिंबाची ते सावखेडा रस्त्याची खड्डे पडून रस्ता खराब झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व प्रवाशी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना लेखी निवेदनाद्वारे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) होय. अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रश्नात नमूद रस्ता हा बोरगाव-नागपूर-म्हैसघाट प्रजिमा १० आहे. रस्त्याची एकूण लांबी ३४.४० कि.मी. आहे. चिंचोली लिंबाची व सावरखेडा या दोन गावा दरम्यानच्या रस्त्याची लांबी १२ कि.मी. आहे. या लांबीतील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या लांबीतील २.८० कि.मी लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्याचे काम नाबार्ड २० योजने अंतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरीत लांबीत करावयाची कामे मंजूरी निकष निधी व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**नगद-दौंड (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील रस्त्याच्या कामाबाबत**

**(१८) १८८८१ (०३-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगद-दौंड (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील रस्त्याच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) या रस्त्याच्या कामात आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे व रस्त्याचे किती काम प्रलंबित आहे,

(३) या रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५) :**(१) सदर रस्त्यावरील मंजूर कामाची निविदा निश्चिती होऊन कामे प्रगतीत आहेत.

(२) या रस्त्याच्या कामासाठी आतापर्यंत अंदाजे रु.९.०० कोटी ५१ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) सदर रस्त्याच्या संपूर्ण लांबीची डागडुजी करण्यात आली आहे. राहिलेल्या कामाबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्राप्त निधी अपुरा असल्याने कामाची प्रगती मंदावली आहे.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सप्तलिंगी येथील पुलाच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१९) १९४५५ (१४-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सप्तलिंगी येथील पुलाच्या चौपदरीकरणाच्या कामाचे भुमिपूजन कैंद्रिय रस्ते वाहतुक मंत्री यांच्या हस्ते सुमारे सहा महिन्यांपूर्वी होऊनही प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली दिसत नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप पुलाचे काम चालू न होण्याचे कारणे काय आहेत, तसेच सदर पुलांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी किती महिन्याचे मुदत दिलेली आहे,

(३) असल्यास, सदर पुलाचे काम केव्हा पर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, संबंधीत प्रशासकिय अधिकारी व कंत्राटदारावर कामाच्या दिरंगाईबद्दल शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सप्तलिंगी येथील पुलाच्या चौपदरीकरणाच्या कामाचे भूमिपुजन कैंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री यांच्या हस्ते २४ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेले आहे. कंत्राटदारास दिनांक २७/०१/२०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून कामाची मुदत १८ महिने इतकी आहे. सदर काम दिनांक २६/०७/२०१६ पर्यंत पूर्ण होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (मध्य) (ता.जि.नाशिक) येथे शासकीय विश्रामगृह नसल्याबाबत**

**(२०) १९५७६ (३१-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (मध्य) (ता.जि. नाशिक) येथे शासकीय विश्रामगृह नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव हे पावरलूम शहर आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात राज्यातील व राज्यबाहेरील शासकीय अधिकारी व व्यापारी लोकांचे येणे जाणे सुरु असते परंतू शहरात विश्रामगृह नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही.

मालेगांव शहरात १) गिरणा विश्रामगृह - ११ कक्ष, २) मोसम विश्रामगृह -२ कक्ष, ३) गोदावरी विश्रामगृह - ४ कक्ष, असे एकूण तीन विश्रामगृहात १७ कक्ष उपलब्ध असल्याने गैरसोयीचा प्रश्न उद् भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद् भवत नाही.

---

**राज्यातील सर्व उद्योगधंदे, कंपन्या यांनी नफ्यातील दोन टक्के रक्कम विकासासाठी देण्याबाबत**

**(२१) १९९९० (०६-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय सामाजिक उत्तरदायीत्व कायद्यानुसार राज्यातील सर्व कारखाने, कंपन्यांनी त्यांच्या आजूबाजूच्या दहा किलोमीटर परिसराच्या विकासासाठी त्यांच्या नफ्यातील दोन टक्के निधी राज्य सरकारला देणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी जिल्हाधिकारी यांचेकडे जमा करावयाचा असून, पर्यावरण विभागाच्या मान्यतेने तो विकासकामासाठी खर्च करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश कारखाने, कंपन्या हा निधी देत नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, हा निधी सर्व कारखाने, कंपन्या यांच्याकडून वसूल करा व जे उद्योग, कारखाने, कंपन्या निधी देत नाही त्या बंद करण्याचे आदेश मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सर्व जिल्हाधिकारी यांना दिले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने दिनांक ३१ मे, २०१५ अखेरपर्यंत एकूण किती निधी जमा झाला आहे व किती कारखान्यांनी हा निधी दिला नाही व ज्या कारखाने, कंपन्यानी निधी दिला नाही त्यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-१२-२०१५) :**(१) केंद्रीय कायद्यात अशी तरतूद नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरणगांव (जि.जळगांव) शहरातील रेल्वे उड्डाणपूलाच्या बांधकामाबाबत**

**(२२) २००१५ (०७-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगांव (जि.जळगांव) शहरातील रेल्वे उड्डाणपुलासाठी १२ कोटी रुपयांच्या निविदेला मंजूरी मिळाली असून सदर कामाकरिता ठेकेदाराला २४ महिन्यांची मुदत देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी २२ महिन्यांचा कालावधी उलटला तरी अद्यापी उड्डाणपुलाचे काम संथगतीने सुरु आहे, सदर उड्डाणपुलाचे बांधकाम रखडल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

निविदा रक्कम १२ कोटी काम पूर्ण करण्याची मुदत ३० महिन्यांची आहे.

(२) रेल्वे विभागाचे काम पूर्ण झाल्याशिवाय त्यालगतचे काम सा.बां. विभागास पूर्ण करता येत नसल्याने कामाची गती मंदावली आहे. काही वेळा वळण रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होते. सद्यस्थितीत काम प्रगतीत असून डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण-राजगुरुनगर या दोन राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल व रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२३) २०५२८ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण-राजगुरुनगर या दोन राष्ट्रीय महामार्गावरील नियमित होणा-या वाहतुक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी उड्डाणपूल व रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, प्रस्तावावर निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५)** :(१), (२) व (३) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.६० (जुना ५०) कि.मी. १२/१९० ते ४२/०० ही राजगुरुनगर पर्यंतची २९.८१ कि.मी. लांबी चौपदरी आहे. या लांबीच्या सहापदरीकरणाचा प्रकल्प सुसाध्यता अहवाल मुख्य अभियंता राष्ट्रीय महामार्ग, नवी मुंबई यांचे पत्र क्र.CE (NH/P-२/NH५०/(६०/१४६६/२०१५ दि.१०/७/२०१५ अन्वये केंद्र शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावात चाकण (कि.मी. ३२/००) येथे नाणेकरवाडी-तळेगाव चौक-आंबेठाण येथे उड्डाणपुलाचे बांधकाम समाविष्ट आहे.

केंद्र शासनातर्फे प्रस्तावाची तांत्रिक छाननी करण्यात येत आहे.

---

**देशातील आठ राज्यांच्या नक्षलग्रस्त भागांचा कायापालट करण्यासाठी रस्ते विकास कृति आराखडा (ॲक्शन प्लॅन) तयार करण्याबाबत**

**(२४) २०५६७ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील आठ राज्यांच्या नक्षलग्रस्त भागांचा कायापालट करण्यासाठी केंद्र शासनाने रस्ते विकास कृति आराखडा (ॲक्शन प्लॅन) तयार केला आहे त्यामध्ये राज्यातील नक्षलग्रस्त गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्याकरीता किती रुपयांची तरतूद केली आहे,

(२) असल्यास, या तरतूदींचा विनियोग राज्य शासन कशा प्रकारे करणार आहे त्याचा आरखडा तयार करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदरची कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१५)** :(१) व (२) होय.

नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याकरीता आर.आर.पी. टप्प-२ अंतर्गत प्राधान्य (१) मध्ये रु.३८०.८० कोटी रकमेचा व प्राधन्य (२) मध्ये रु.१२०१.१० कोटी रकमेचा असा एकूण रु. १५८१.९० कोटी रकमेचा रस्ते व पूल विकासाचा कृती आराखडा दि.३/९/२०१५ रोजी केंद्र शासनास सादर केला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील टप्पा-२ अंतर्गत १७१.०० कि.मी. लांबीचा रस्ते सुधारण्याचा प्रस्ताव दि.२१/८/२०१२ रोजी केंद्र शासनास सादर केला असून अद्याप यास केंद्र शासनाची मंजूरी अप्राप्त आहे.

वरील कामांना केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर ती कामे कार्यान्वीत करण्याची कार्यवाही करण्यात यईल.

(३) केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध तरतूदीनुसार सदरची कामे पूर्ण करण्यचे नियोजन राहील.

---

**आदिवासींसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत**

**(२५) २०८२१ (३१-०७-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी शासनाने आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रशिक्षण केंद्राला शासनाने ८१ लाख ५६ हजार १६ रुपयाचा निधी दिला नसल्याने केंद्राचे कामकाज बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, गडचिरोलीत गोंडवाना विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा मार्गदर्शन केंद्राला शासनाने निधी न दिल्यामुळे उक्त विद्यापीठ बंद पडले असल्याचे दि.२८/४/२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे तसेच सदर केंद्र प्रत्यक्षात सुरु करण्याच्यादृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :**(१), (२), (३) व (४) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या अनुक्रमे भारतीय प्रशासकीय सेवा व राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा पूर्व परिक्षांसाठी पुणे विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे २५ विद्यार्थी व यशदा, पुणे येथे १० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. याकरिता दरवर्षी रु. १८३.२७ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी बार्टी, पुणे यांचेमार्फत करण्यात येते. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश पात्रता परिक्षा (CET) द्वारे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. सन २०१४-१५ या वर्षीचा प्रशिक्षणाकरीता प्रवेश पात्रता परिक्षेमध्ये फक्त २ विद्यार्थ्यांना ३०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले. त्यानुषंगाने प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण न देता, बार्टी, पुणे यांनी सादर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार चाळणी परिक्षेत कमाल गुण प्राप्त झालेल्या केंद्रनिहाय संख्येनुसार उमेदवारांची प्रशिक्षणाकरिता निवड करुन सर्व केंद्रातील एकूण ५४ उमेदवारांना बार्टी, पुणे येथे प्रशिक्षण देण्याबाबत कळविण्यात आले आहे. यासाठी बार्टी, पुणे या संस्थेस रु.७०,९७,७५०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. तसेच यशदा,

पुणे या संस्थेस संघ लोकसेवा प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणासाठी १० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी रु.१८,८०,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक वसाहतींना सबसीडी देण्याबाबत**

**(२६) २१२२७ (३१-०७-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिक वसाहतीसाठी शेजारच्या राज्यातील वीजेचे दर आणि महाराष्ट्रातील वीजेचे दर यात मोठ्या प्रमाणात तफावत असल्याने विदर्भातील स्टील कंपन्या मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे उभारण्याचा निर्णय कंपन्या मालकांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महाराष्ट्रात सुरु असलेल्या कंपन्या राज्यात राहाव्यात म्हणून औद्योगिक वसाहतींना सबसीडी देणेबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०५-०१-२०१६) :**(१) महाराष्ट्रातील वीजदर सुकृतदर्शनी इतर राज्यांच्या तुलनेत जास्त दिसत असले तरी विदर्भातील स्टील कंपन्या मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे उभारण्याचा निर्णय कंपनी मालकांनी घेतल्याबद्दलची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही.
(२) व (३) याबाबत शासन निर्णय दि.२९/०९/२०१५ अन्वये विदर्भ, मराठवाडा विभागातील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या विजेच्या दराचे सुसुत्रीकरण व तद्अनुषंगिक बाबींवर अभ्यास करण्यासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात झालेली वृक्षतोड**

**(२७) २१५०० (३१-०७-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर होणारी विकास कामे, रस्ता चौपदरीकरणाचे काम, महामार्गावर प्रकल्प उभारणी आदी कारणांनी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात येत असून नागरिकांना ग्लोबल वार्मिंग सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकामाच्या आड येणारे वृक्ष तोडण्यासाठी संबंधित विभागाची परवानगी घेण्यात येते, परंतु परवानगीच्या व्यतिरिक्तही शेकडो वृक्षांची अनाधिकृत तोड होत असल्याचे माहे जून, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी कायद्यात सुधारणा करुन वृक्षतोडीचे नियम कठोर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) व (२) भंडारा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या सुधारणांकरीता होणारी वृक्षतोड ही सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीनंतरच करण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगांव ते चिखली (जि.बुलढाणा) हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाचा भाग म्हणून घोषित करण्याबाबत**

**(२८) २१६५५ (३०-०७-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी करणातंर्गत असलेला जालना-बेराळा-चिखली (भाग-१) ची संपूर्ण लांबी राष्ट्रीय महामार्गाचा भाग घोषित झाला असल्यामुळे सदर रस्ता केंद्र शासनाचे सडक परिवहन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामधील चिखली ते खामगांव (भाग-२) ही लांबी राष्ट्रीय महामार्गाच्या भागामध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) व (२) जालना-बेराळा-चिखली ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र ७५३ अ चा भाग म्हणून घोषित झालेली आहे. तथापि, सदर लांबी केंद्र शासनाचे सडक परिवहन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली नाही.
चिखली ते खामगांव ही लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.), नवी मुंबई यांचेकडून मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फेकरी (ता.भुसावळ,जि.जळगांव) येथील गावाजवळ फेकरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीव्दारे सोई सुविधा मिळणेबाबत**

**(२९) २१७२३ (३१-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फेकरी (ता.भुसावळ,जि.जळगांव) येथील गावाजवळ फेकरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीद्वारे टोल वसुली करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोल वसुली कंपनी द्वारे रस्त्याची दुरुस्ती वा देखभाल न करता तसेच टोइंग व्हॅन उपलब्ध नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सोई सुविधा वाहन चालकांना न पुरवणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.

नागपूर-सुरत-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर फेकरी गावाजवळील रेल्वे उड्डाणपुल व पोचरस्त्याचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून त्यावर फेकरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेमार्फत पथकर वसुली प्रगतीत आहे.

(२), (३) व (४) टोईंग व्हॅन नसल्याची बाब खरी आहे. सद्यस्थितीत संबंधित कंपनी रस्त्याची देखभाल व किरकोळ दुरुस्ती रस्त्याच्या पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरुन करत आहे. याबाबत चौकशी करुन पावसाळ्यानंतर रस्त्याचे नुतनीकरण करुन रस्ता वाहतुकीस योग्य ठेवणेबाबत संबंधित ठेकेदारास नोटीस दिली आहे. तसेच वाहनचालकांना वैयक्तिक सुविधा उदा.प्रथमोपचार, टोईंग व्हॅन इ. पुरविणे बाबत आदेशित केले आहे व त्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयातील वसमत-लोहरा खुर्द ही बस सेवा मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याबाबत

**(३०) २२०४९ (१३-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील वसमत-लोहरा खुर्द ही बस सेवा मागील दोन महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहरा व आजूबाजूच्या परिसरातील मुख्यत्वे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी बस शिवाय अन्य वाहनाची सोय नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास रस्ता नादुरुस्त असल्यामुळे ही बससेवा बंद झालेली आहे तसेच नागरिकांनी सतत मागणी करुनही अद्याप रस्ता दुरुस्त करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी तात्काळ रस्ता दुरुस्त करुन बससेवा पूर्ववत चालू करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) सद्य:स्थितीत सदर मार्गाची तात्पुरती दुरुस्ती करुन बससेवा सुरु करण्यात आली आहे.

(४) रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करुन बससेवा पूर्ववत सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील झरीजवळ येथील लेंडी ओढ्यावर नव्यानेच उभारण्यात आलेल्या पुलाला कठडे नसल्याबाबत**

**(३१) २२८७२ (३१-०७-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील झरीजवळ येथील लेंडी ओढ्यावर नव्यानेच उभारण्यात आलेल्या पुलाला कठडेच नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाला कठडेच नसल्यामुळे अपघातात वाढ झाली असून काही दिवसांपूर्वी एक बैल ओढा पात्रात कोसळून त्याचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाच्या दोन्ही बाजुंनी कठडे उभारण्यात यावेत अशी मागणी स्थानिक परिसरातील वाहनधारकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) या कार्यालयास अवगत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करण्यात आली. सदर पुल हा बुडीत पध्दतीचा असल्याने पुलाला पक्के कठडे बांधण्यात आलेले नाहीत. तथापि, सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलाच्या दोन्ही बाजूस ०.७५ मी. उंचीचे पिलर्स बांधण्यात आले आहेत. पुल सुस्थितीत असून पुलावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे.

(५) सदर पूल बुडीत पध्दतीचा असल्याने पुलावर collapsible steel railing आवश्यक असून निधी मंजूरी व निकषाच्या अधीन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**परभणी तालुक्यातील (जि.परभणी) टाकळी कुं. ते नांदापूर या दोन गावादरम्यान असणाऱ्या परभणी-जिंतूर या राज्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याबाबत**

**(३२) २२८७५ (१४-०८-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तालुक्यातील (जि.परभणी) टाकळी कुं. ते नांदापूर या दोन गावादरम्यान असणाऱ्या परभणी-जिंतूर या राज्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डयांचे साम्राज्य असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय आहे,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील खड्डयामुळे दुचाकीसह चारचाकी वाहनधारकांना मोठी कसरत करीत वाहने चालवावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे सातत्याने तक्रारी / पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) कार्यकारी अभियंता यांनी दि.२५.८.२०१५ रोजी पाहणी केली असून किमी १०२/००० ते किती १०३/००० या एक किमी लांबीत खड्डे असल्याचे आढळून आले आहे.

(५) टाकळी ते नांदापूर या रस्त्याचे डांबरी नूतनीकरण सन २०१५-१६ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेले आहे. मंजूरी व निधी प्राप्त होताच काम पूर्ण करण्यात येईल.

---

**जळगांव, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील आदिवासांच्या वैयक्तिक दाव्याबाबत**

**(३३) २३०१० (१७-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन जमिनी मिळण्यासाठी वन हक्क मान्य करणे अधिनियम २००६ नुसार जळगांव, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील किती आदिवासींचे वैयक्तिक दावे प्रशासनास माहे मार्च, २०१५ पर्यंत प्राप्त झाले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर वैयक्तिक दाव्यापैकी किती दाव्यांना मान्यता देण्यात आली आहे,

(३) असल्यास, उर्वरित दाव्यांना मान्यता शासन कधी देणार आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :**(१) व (२) वनहक्क कायदा, २००६ अंतर्गत माहे मार्च, २०१५ अखेर जळगांव, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक दाव्यांची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | वैयक्तिक प्राप्त दावे | वैयक्तिक मान्य दावे |
|---|---|---|---|
| १ | जळगांव | ७१४० | १७७३ |
| २ | धुळे | २१७५३ | १४२०६ |
| ३ | नंदुरबार | ३९६१५ | ८६८४ |
| ४ | नाशिक | ५०४४३ | १७५७४ |

(३) प्रलंबित वैयक्तिक दावे डिसेंबर, २०१५ अखेर निपटारा करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**सातारा जिल्ह्यातील शिरवळ बारामती रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत**

**(३४) २३४२० (०३-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील शिरवळ बारामती रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम रखडल्यामुळे या रस्त्यावर वारंवार लहान मोठे अपघात होवून त्यात अनेक निरापराध प्रवाशांचा मृत्यू होवून अनेकजण गंभीर जखमी होत असल्याच्या घटना वारंवार घडतच असल्याचे माहे एप्रिल, मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत तसेच या रस्त्यांच्या चौपदरीकरणाच्या कामास दिरंगाई व टाळाटाळ करणाऱ्या आयव्हीआरसीएल कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.

तथापि, सदर रस्त्यावर झालेले बहुतांशी अपघात हे वाहतुकीच्या नियमांचे पालक न केल्यामुळे झाले असल्याचे पोलीस विभागाच्या अहवालावरुन दिसून येते.

(२) रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भूसंपादनाअभावी पूर्ण होण्यास विलंब होत आहे. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करुन रस्त्याचे काम जलदगतीने करण्याबाबत शासनाचे नियोजन आहे. तसेच रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यासाठी रस्त्याची देखभाल दुरुस्ती उद्योगजकांच्या खर्चाने व जोखमीने विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हा-मावळ तालुक्यातील लोहगड ते दुधिवरे रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३५) २४२६१ (१७-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-मावळ तालुक्यातील लोहगड ते दुधिवरे रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील खडी, डांबर निघाल्यामुळे या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत, रस्त्याच्या साईड पट्टीची खडी वाहुन गेल्याने कडेचे दगडेगोटे उघडे पडले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा रस्ता तीव्र उताराचा असल्याने वाहनचालकांना खडड्यातुनच वाट काढत घाट चढावे व उतरावे लागत असुन यातुन मोठी दुर्घटना घडु शकते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा रस्ता दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने निधीची तरतुद केली आहे काय,

(५) असल्यास, दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) होय.

(५) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ अन्वये कार्ला भाजे लोहगड ते दुधिवरे खींड रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२५ दर्जाचा असून रस्त्याची एकूण लांबी १५/४०० कि.मी. आहे. कार्ला भाजे लोहगड ते दुधिवरे खींड रस्ता सुधारणा करणे कि.मी. १०/०० ते १५/४०० हे काम सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून सदर रस्त्याचा भाग कि.मी. १३/७०० ते १५/४०० या लांबीतील ९०० मीटर लांबीमध्ये रस्ता सुधारणा करणे काम

प्रस्तावित आहे. सदर काम निविदा स्तरावर आहे. तसेच उर्वरीत रस्त्याचे डांबरी पृष्ठभागाचे खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव स्टेशन (ता.मावळ,जि.पुणे) येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(३६) २४२६४ (०४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील तळेगाव स्टेशन चौक ते माळवाडीपर्यंत रोजच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उसे खिंड ते माळवाडीपर्यंत चौपदरी उड्डाणपूल बांधण्याचे सा.बां.विभागाने निश्चित केले असून, तशा स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशाची दखल घेऊन बांधकाम खात्याने उड्डाणपूल बांधण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले असून, तीन वर्षात पूर्ण करण्याची हमी न्यायालयाला दिली आहे. परंतु एक वर्षाचा कालावधी होण्यास अवघा एक महिना बाकी असतानादेखील कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उड्डाणपुलाच्या मंजूरी व निधीबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) खाजगीकरणांतर्गत “बांधा वापरा व हस्तांतरित करा” या तत्वावर तळेगाव ते चाकण कि.मी ०.०० ते कि.मी. २४.०० या लांबीचे सहापदीकरण/चौपदरीकरण करणे या प्रकल्पात तळेगाव येथील उड्डाणपुलाचा समावेश करुन प्रकल्पाची तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता तपासण्यात येत आहे. सदर प्रकल्प खाजगीकरणांतर्गत सुसाध्य न झाल्यास निधीची उपलब्धता व कामाची निकड विचारात घेऊन सदर प्रकल्पाचे काम इतर योजनेतून हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

---

**भडगांव (जि.जळगांव) येथील गिरणा नदीवरील पूलाचे सिमेंट कठडे तुटल्याबाबत**

**(३७) २४३८० (३१-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव (जि.जळगांव) येथील तीन तालुक्यांना जोडणारा गिरणा नदीवरील पुलाला ५७ वर्षे झाली असून पुलावरील सिमेंट कठडे तुटल्याने या पुलाचा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सर्व्हे करुन तसा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार या पुलाच्या कामाकरिता किती निधीची आवश्यकता आहे, तसेच सदरचा निधी शासन कशाप्रकारे उपलब्ध करुन देणार आहेत,
(३) असल्यास, गिरणा नदीवरील या पूलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.

गिरणा नदीवरील या पुलाचे बांधकाम सन १९५८ मध्ये झालेले असून हा पूल High Level submersible प्रकारचा असल्याने सदर पुलास रेलींगकरिता बंदीस्त कठड्याऐवजी कॉक्रीटचे खांब व साखळी अशी तरतूद आहे. सदर कॉक्रीटचे खांब तुटलेले नसून सुस्थितीत आहेत. त्यामुळे दुरुस्तीचा कोणताही प्रस्ताव नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेठ (ता.आंबेगाव, जि.पुणे) हद्दीतील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण व भूसंपादन करण्याबाबत**

**(३८) २४५०५ (३१-०७-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेठ (ता.आंबेगाव, जि.पुणे) हद्दीतील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण व भूसंपादन अयोग्य पध्दतीने शासन करीत असल्याने त्याविरोधात तेथील शेतक-यांनी विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गाचे पेठ हद्दीतील रस्ता रुंदीकरण करतांना शेतक-यांना भूसंपादन झालेल्या जमिनीला योग्य भाव मिळावा तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूने समसमान रुंदीकरण करावे अशी मागणी तेथील शेतक-यांनी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत प्रश्न भाग (२) मधील शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५)** :(१) पुणे जिल्ह्यातील खेड ते सिन्नर राष्ट्रीय महामार्ग क्र.५० च्या चौपदरीकरणाकरीता जमिनीच्या भूसंपादनास शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला हे खरे आहे. परंतु सदर भूसंपादन प्रचलित राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन कायदा १९५६ (Land Acquisition NH Act १९५६) अंतर्भुत असलेल्या तरतूदीनुसार तसेच केंद्रीय भूतल परिवहन व राजमार्ग मंत्रालय (Ministry Road Transport and Highways) यांनी आखून दिलेल्या सूचनेनुसार करण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण नाशिक यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाकरीता लागणारे भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन कायदा १९५६ च्या तरतूदीनुसार होत आहे. भूसंपादन झालेल्या जमिनीचा मोबदला भूसंपादन सक्षम प्राधिकरण (CALA) यांचेमार्फत First Schedule of Right to Fair Compensation and resettlement Act २०१३ (RFCTLARA ACT २०१३) (प्रथम अनुसूची रास्त मोबदला अधिकार व पुनर्वसन कायदा २०१३) व त्यानंतर त्यामध्ये झालेल्या सुधारणा २०१५ चे तरतुदीनुसार होत आहे रस्ता रूंदीकरणाकरीता अधिग्रहीत करावयाच्या शहरामधील जागेमध्ये ज्या भागामध्ये बांधकाम आहेत त्या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूस समसमान जमीन अधिग्रहीत करण्यात येत आहे. परंतु ग्रामीण भागामध्ये एका बाजूस जमीन अधिग्रहीत करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहे.

१) अस्तित्वातील दोन पदरी रस्ता हा वळण रस्ता म्हणून वापरता येईल.

२) एका बाजूची पूर्ण वाढ झालेली किंमती झाडे वाचविणे.

३) एका बाजूस नियमित जमीन वाहतूक सुरु ठेऊन दुसऱ्या बाजूचे दुपदरीकरणाचे काम सुरु ठेवणे.

४) जून्या दोनपदरी रस्त्याचा वापर करुन पुर्णपणे नविन चारपदरी रस्ता तयार करतांना होणाऱ्या खर्चात कपात करणे.

५) जून्या रस्त्याच्या समसमान दोन्ही बाजूस रुंदीकरण करतांना अस्तित्वातील पुल व मोऱ्यांची आवश्यक रुंदीकरण शक्य होणार नाही त्याऐवजी नविन मार्गिकेवर नविन पुल व मोऱ्या बांधणे जास्त सोयीस्कर होईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी उपाययोजना अंतर्गत टीएसपी या शिर्षकाखाली निधी मिळण्याबाबत**

**(३९) २५२५४ (३१-०७-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ च्या बजेटमध्ये आदिवासी उपययोजना अंतर्गत टीएसपी या शिर्षकाखाली ३४ कोटी रुपयांचा निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, आर्णी यांनी मा.आदिवासी विकास मंत्र्यांना दिनांक १० मार्च, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, आर्णी मतदार संघातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि.१०/४/२०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे घाटंजी, आर्णी व केळापूर तालुक्यातील मुलां-मुलींच्या वसतीगृह इमारत बांधकामासाठी ६ कोटी निधी मिळणेबाबतची विनंती मा.मंत्री (आदिवासी) महोदयांकडे केली आहे.

(२) दि.१०-०४-२०१५ च्या निवेदनावर आयुक्त, नाशिक कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्णी, घाटंजी, केळापूर या तालुक्याच्या ठिकाणी समाज भवन उभारणीकरिता निधी मिळण्याबाबत

**(४०) २५२५७ (३१-०७-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी, घाटंजी, केळापूर या तालुक्याच्या ठिकाणी समाज भवन उभारणीकरिता ३ कोटी निधी मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, आर्णी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री, मुंबई यांना दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुकयातील आदिवासी शासकीय वस्तीगृहातील निधी व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, आर्णी यांनी दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास सहकार मंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,

(३) तसेच, आदिवासी उपाययोजना अंतर्गत उक्त तालुक्याची रस्त्याची कामे मंजूर करण्याबाबतचे निवेदन ११ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी ,आर्णी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री ,मुंबई यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनांवर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :**(१), (२) व (३) होय.

(४) नाही.

(५) मा.विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १०.०४.२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने आर्णी, घाटंजी व केळापूर या तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी समाज भवन उभारण्याच्या दृष्टीने जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा व पुसद यांचे स्तरावर आर्णी, घाटंजी व केळापूर येथे आदिवासी समाज भवन बांधण्याकरिता जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, घाटंजी येथील इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिलेली असून प्रशासकीय मान्यता देण्यासाठी वित्त विभागास आवश्यक असलेली अतिरिक्त माहिती आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडून मागविण्यात आली आहे. तसेच आर्णी व केळापूर येथे आदिवासी शासकीय वसतीगृह बांधकामाबाबतची अंदाजपत्रके सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना कळविण्यात आले आहे.

आर्णी तालुक्यातील १२ रस्त्यांची कामे २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई गोवा महामार्गावरील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील भूसंपादन करण्यात आलेल्या स्थानिकांच्या पुनर्वसनाबाबत**

**(४१) २५८२७ (०४-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामार्ग क्र. ६६ (आधीचा क्र.१७) यांचे चौपदरीकरण करण्यासाठी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यात भुसंपादन करण्याकरिता स्थानिकांना विश्वासात न घेता प्रांत कार्यालयाकडून मोजणी सुरु झाली असे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमुळे जे विस्थापित होणार आहेत त्यांना बाजारभावानुसार नुकसान भरपाई व पुर्नवसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या यांचे चौपदरीकरणासाठी भुसंपादन करताना प्रथम नवीन हद्दीचे दगड लावण्यात आले. तद्नंतर भूमी अभिलेख खात्याकडून मोजणीबाबतच्या नोटीसा स्थानिक तलाठी यांचेमार्फत संबंधीत भुधारकांना बजावण्यात आल्यानंतरच मोजणीचे काम हाती घेण्यात आले.
(२) सदरील भुसंपादन राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ नुसार करण्यात येत असून संयुक्त मोजणीचे काम जवळ जवळ पुर्ण झाले आहे. नुकसान भरपाईबाबत पुढील कार्यवाही प्रचलित नियम व कायद्यास अनुसरून महसूल विभागामार्फत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली-धर्माबाद (जि.नांदेड) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४२) २५९३६ (०७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली-धर्माबाद (जि.नांदेड) या रस्त्याची अवस्था दयनीय झाली असून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले पडल्यामुळे त्याचा वाहनचालक, प्रवासी नागरीक यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिलोली ते बासर हा रस्ता त्रिपदरी करण्यात येणार असल्याचे कारण देत बिलोली तालुक्यातील अनेक भागातील रस्त्याच्या कडेच्या भागातील झाडे मोठ्या प्रमाणात तोडण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या दुरुस्तीबाबत रस्त्याचे काम निर्धारीत वेळेत पूर्ण करण्याबाबत तसेच रस्त्याच्या कडेला वृक्षलागवड करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.
बिलोली ते धर्माबाद एकूण रस्त्याची लांबी २०/००ते ४१/०० असून त्यापैकी २९/०० ते ४१/०० ही लांबी क्षतीग्रस्त झाली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) क्षतिग्रस्त रस्त्याच्या सुधारणेचे काम सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूर आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने आवश्यक तेथे खडी व मुरुम टाकून खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर- हैद्राबाद रा.म.मा.९ या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(४३) २६१६३ (०७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर- हैद्राबाद रा.म.मा.९ या रस्त्याच्या चौपदरीकरणाकरिता भूसंपादन करण्यात येणा-या जमिनीचा मावेजा व इतर तक्रारी अर्जाची वैयक्तिक व कायदेशीर सुनावणी होत नसलेल्या कारणाने संबंधित शेतक-यांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत असल्याबाबत व सदर प्रकरणी सर्व आक्षेप अर्जाचे वैयक्तिक व कायदेशीर सुनावणी घेण्यात येण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहार यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दि ७ सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधिताद्वारे कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांचे आर्थिक नुकसान होण्यास जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

बाधीत शेतकरी व लोकप्रतिनिधी तालुका उमरगा व लोहारा यांनी त्यांचे निवेदन दिनांक २९.०८.२०१३ व १६.०९.२०१३ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ च्या चौपदरीकरणासाठी तालुक्यातून संपादन होणाऱ्या जमिनीच्या मुल्यांकनाबाबत मावेजा निश्चित करताना पुणे-सोलापूर रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या वेळी करण्यात आलेल्या नुकसान भरपाई म्हणून (दिलासा रक्कम) ४२% देण्यात यावी अशी विनंती करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे कार्यालयाचे पत्रान्वये प्रबंधक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांना बाधीत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार संपादीत क्षेत्रास वाढीव ४२% वाढीव मावेजा देणेबाबत अभिप्राय सादर करणेबाबत सुचीत करण्यात आले होते. तथापि प्रबंधक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी याबाबत करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानुसार राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणासाठी संपादन होणाऱ्या जमिनीसाठी ४२% वाढ अधिनियम १९५६ मध्ये तरतुद नसल्याचे स्पष्ट नमुद केले आहे. त्यामुळे संबंधितांविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवतनाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवरुख -रत्नागिरी (जि.रत्नागिरी) मार्गावर (ता.संगमेश्वर) पांगरी घाटातील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) २६३२५ (३१-०७-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख - रत्नागिरी मार्गावर (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथील पांगरी घाटातील रस्त्याची दुरावस्था झालेली असून काही ठिकाणी दरडी धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाची सुधारणा करणे व धोकादायक दरडी काढयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्नांकित पांगरी घाट रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्टभागाची असून ती सुस्थितीत असून वाहतुक सुरळीत सुरु आहे. या घाटभागातील कि.मी. ०/०० ते ४/०० या लांबीमध्ये पावसाळ्यामध्ये कोसळणाऱ्या दरडी विभागाकडे उपलब्ध मजूर व साधन सामुग्री वापरुन तात्काळ काढल्या जातात व रस्ता सुस्थितीत ठेवण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील आदिवासी पारधी समाजाच्या मागण्यांबाबत**

**(४५) २६६५५ (३१-०७-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे आदिवासी पारधी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे दिनांक १ जून, २०१५ रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्या कोणत्या आहेत,

(३) तसेच सदर मागण्यांच्या पूर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-१२-२०१५) :**(१) होय.

(२) श्री.ज्ञानेश्वर कुंडलिक भोसले, अध्यक्ष, भारतमाता आदिवासी पारधी समाज व भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, दत्तनगर, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी दिनांक ०१.०६.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिलेल्या निवेदनामध्ये खालीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत :- (१) सोलापूर जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी मा.जगदीशजी पाटील साहेबानी सर्व पारधी समाजाच्या कुटूंबांना रेशनकार्ड दिले पण ज्या गावामध्ये पारधी कुटूंब आहे. त्या ठिकाणचे रेशन दुकानदार धान्य देत नाही. कारण त्यांना तात्पुरते रेशन कार्ड दिले आहे. धान्य देण्यासाठी नाही असे सांगतो. (२) ज्या गावामध्ये पारधी समाज २४ ते ३० वर्षापासून राहत आहे. त्या गावच्या ग्रामपंचायतीने राहण्यासाठी गावठान जिल्हाधिकारी सरकार अशा शर्तीच्या जमिनीमध्ये २ गुंठे जागा राहण्यासाठी देण्यात यावी यासाठी ग्रामपंचायत यांना आदेश करावे. (३) आदिवासी विभाग सोलापूर यांच्याकडून आदिवासी विकास योजना अंतर्गत घरकुले दिले जातात ती योजना सर्व तालुक्याच्या कुटूंबापर्यंत पोहचत नाही. घरकुल सर्व ग्रामीण भागातील लोकांना सर्वे करुन देण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे. (४) २०१० मध्ये आदिवासी पारधी समाजासाठी २ एकर बागायत किंव ४ एकर जिरायत जमीन देण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी मा.जगदीशजी पाटील साहेब यांनी सर्व तालुक्याच्या कुटुंबांचा व तालुक्यातील शासनाच्या जमिनीचा सर्वे करुन त्याचा विकास आराखडा शासनाकडे पाठविला आहे तो मंजूर करावा व शासनाने पारधी समाजाला जमीन कसून खाण्यासाठी लवकरात लवकर द्यावी. (५) १० वी ते ११ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलांना नोकरी मिळत नाही म्हणून ते वाईट मार्गाला लागण्याची शक्यता आहे. शासनाने अशा मुलांना न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत उद्योग व्यवसायासाठी तालुक्यातील १० वी ते ११ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलांना दोन लाखापर्यंत व्यवसाय कर्ज देण्याची तरतूद करावी. (६) भारतात आदिवासी पारधी समाज व भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान दत्तनगर मोहोळ, जि.सोलापूर या संस्थेचा निवासी आदिवासी शाळेचा प्रस्ताव आदिवासी विभागाकडे सन २०१० मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पाठविला आहे. शासनाकडे पाठपुरावा करुनसुध्दा शासन दरबारी यांची दखल घेतली जात नाही. या संस्थेमार्फत चालू असलेल्या व शिकत असलेल्या १२० विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

राहण्याची भिती आहे. त्यामुळे निवासी आश्रमशाळेला लवकरात लवकर शासनाने मान्यता द्यावी. (७) आदिवासी पारधी समाजाची मुले कशी बशी D.ed, B.ed, B.A., M.A. अशी शिकून भटकंती करत आहेत. मुळात पारधी समाजावर मारलेला गुन्हेगारीचा शिक्का तो समाजामध्ये आजही तसाच आहे व पोलीसांच्या बघण्याचा दृष्टीकोन तसाच आहे. त्यामुळे ही मुले-मुली शिक्षण घेऊन गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता आहे. शासनाची या मुली मुलींना विचार करुन जास्तीत जास्त शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्याची तरतूद करावी व तो माणूस म्हणून जगेल याची दखल शासनाने घ्यावी. (८) सोलापूर येथे आदिवासी विभागीय कार्यालयाचे औपचारिक उद्घाटन १५ ऑगस्ट, २०१३ रोजी झाले परंतु कार्यालयासाठी अद्याप जागा नाही. त्यामुळे अडचण होत आहे. तरी शासनाने उत्तर सोलापूर तहसिल कार्यालयामध्ये जागा लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी. (९) सोलापूर येथे आदिवासी विभागाचे कार्यालय झाले परंतु कर्मचारी नाहीत त्यामुळे कामकाजात विलंब होत आहे. शासनाने आदिवासी विभागाचे कर्मचारी पदभार लवकरात लवकर करावा. (१०) सोलापूर जिल्ह्यामध्ये २९० गावामध्ये पारधी समाज कायमचा रहिवासी आहे, आणि शेतीचे काम छोटे मोठे उद्योग व्यवसाय व भिक मागून जिवन जगत आहेत. परंतु तालुक्याचे व जिल्ह्याचे पोलीस अधिकारी यांच्याकडून पारधी समाजाला गुन्हेगार समजून कुठेही चोरी, दरोडा झाला की वारंवार त्रास केला जातो व रात्री बेरात्री छापे टाकले जातात. त्यामुळे मुला-बाळांना व महिलांना त्याचा त्रास होतो. त्यामुळे पारधी समाजाचे जिवन जगणे अवघड झाले आहे. त्यामुळे पोलीसाकडून होणारा त्रास थांबवावा व संबंधितांना आदेश द्यावेत.

(३) व (४) मागण्यांबाबत करण्यात आलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे :-

(१) शासन निर्णय क्र.साविव्य १००५/प्र.क्र.१९६३/नापु-२८, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, दिनांक ०९.०९.२००८ अन्वये राज्यातील सर्व विडी कामगार तसेच पारधी व कोल्हाटी समाजाच्या कुटुंबाना तात्पुरत्या स्वरुपात बी.पी.एल. शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. (२) व (४) दिनांक ०४.०२.२०१० च्या शासन निर्णयान्वये स्वाभिमान सबळीकरण योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी भूमिहीन लाभार्थ्यांना उपजिविकेचे साधन म्हणून कसण्यासाठी जमीन उपलब्ध करण्यात येते. (३) पारधी आदिवसी समाजाला सन २०१२-१३ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये ३५९ व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये १२८ लाभार्थ्यांना तसेच सन २०१३-१४ मध्ये सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यात १९८ लाभार्थ्यांना घरकूल देण्यत आली आहेत. यामध्ये विधवा, परितक्त्या, महिला व अपंग यांना घरकुलासाठी खास प्राधान्य देण्यात आली आहेत. यामध्ये कवधवा,परित्क्त्या,महिला व अपंग यांना घरकुलासाठी खास प्राधान्य देण्यात आली आहे. (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, सोलापूर यांचे अधिनस्थ असलेल्या सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील इ.१० वी ११ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळत नसल्याने त्यांच्याकरीता न्युक्लिअस बजेट योजना सुरु करण्यात आलेली आहे, या योजनेतून इच्छुक लाभार्थ्यांस ५० हजार पर्यंत व्यवसायासाठी वैयक्तिक लाभ देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. (६) पारधी समाजाच्या मुला-मुलींसाठी अनुदानित आश्रमशाळेबाबत आयुक्त, आदिवासी विकास यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. (७) राज्यातील लोकसेवेवरील पदावरील नेमणूकीसाठी नियमाप्रमाणे

आरक्षणानुसार कार्यवाही केली जाते. यामध्ये अनुसूचित जमाती करीता आरक्षण आहे. त्याचा लाभ पारधी जमातीस अनुज्ञेय आहे. (८) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, सोलापूर या कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे स्तरावर सुरु आहे. (९) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. (१०) याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे स्तरावरुन पोलीस आयुकत, सोलापूर व पोलीस अधिक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांना सूचना दिल्या आहेत.

---

**कळसुबाई ते इंदोरे (ता.इगतपुरी) असा रोप वे करणेबाबत**

**(४६) २६७५५ (१२-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वोच्च शिखर कळसुबाई येथे पर्यटनास चालना मिळण्यासाठी कळसुबाई ते इंदोरे (ता.इगतपुरी) असा रोप वे करणे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, मा.आमदार (सिन्नर) श्री.राजाभाऊ (पराग) वाजे यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून लिहिलेल्या दि.२३/०२/२०१५ च्या पत्रान्वये इंदोरे ते कळसुबाई रोप वे होण्यास मंजुरी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

(२) मागणी केलेला रोप वे वन विभागाच्या ताब्यात असलेल्या जमिनीतून जात असल्याने सदर रोप वे चे सर्वेक्षण व सुसाध्यता तपासणी करण्यासाठी वन विभागाच्या मान्यतेस्तव उप वन संरक्षक, वन विभाग, नाशिक यांना सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ इगतपुरी यांच्यामार्फत दि.१०/०९/२०१५ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड पंढरपूर (जि.रायगड) मार्गावरील वाघजाई ते भोर दरम्यान साईडपट्टी नसल्याने गाड्यांचे टायर फुटून अपघात होण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(४७) २६८०० (०५-०७-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड पंढरपूर (जि.रायगड) मार्गावरील वाघजाई ते भोर दरम्यान साईडपट्टी नसल्याने अनेक वाहनांचे टायर फुटून अपघात होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड व रत्नागिरी जिल्ह यासह कोकण पश्चिम महाराष्ट्रातील वाहतूकीकरीता महाड पंढरपूर राज्यमार्गाचा वापर व्यापारी वर्गाकडून केला जात असून कोकणचे व पुण्याचे अंतर या राज्यमार्गामुळे कमी होते म्हणून बहुतांशी पर्यटक, व्यापारी या राज्यमार्गाचा वापर करत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,वाघमाई ते भोर पुणे जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणा-या राज्य मार्गावर साईडपट्टी नसल्याने अनेक वाहनांचे टायर फुटून अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच तदनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन वाघजाई-भोर हा रस्ता महाड ते पंढरपूर या प्रमुख राज्य मार्ग क्र.१५ चा भाग असून त्याची लांबी ४६.९ कि.मी. आहे. उपरोक्त लांबीपैकी ४०.४ कि.मी. लांबीतील रस्ता अत्यंत दुर्गम घाट रस्ता असून अतिपर्यजन्याच्या भागातील आहे. सदर रस्त्यापैकी २९.५० कि.मी. लांबीतील रस्त्याची धावपट्टी ही ३.७५ मी. इतकी अरुंद असून दोन वाहनांना परस्परांना ओलांडताना धावपट्टीखाली उतरावे लागते त्यामुळे तसेच पावसाळ्यातील अतिपर्यन्यामुळे बाजुपट्टया वारंवार खचतात.

सदरील बाजुपट्टया पावसाळ्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त करण्यात येतात. तथापि सदर रस्त्याच्या बाजुपट्टयांच्या मजबुतीकरण व सुधारणा करण्याचे काम सद्यस्थितीत विविध योजनांतर्गत प्रस्तावाधीन असून निधी, निकष व प्राधान्याने पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट आदिवासी विकासाच्या नावाखाली विविध योजनांवर निधी खर्च करण्यात आल्याबाबत

**(४८) २७०८१ (०६-०८-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट आदिवासी विकासाच्या नावाखाली विविध योजनांवर करोडो रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत आदिवासीपर्यंत या विविध योजना पोहचल्या नाहीत, हे खरे आहे काय, तसेच सिंचन तलावासाठी ७० लाख खर्च करुन सुध्दा या तलावामध्ये पाणी साचत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०९-१२-२०१५) :**(१) व (२) आदिवासी विकास विभागामार्फत राज्यामध्ये सर्वत्र आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासींच्या विकासाकरिता करोडो रुपयांचा निधी विविध योजना राबविण्याकरिता खर्च करण्यात येतो. सदरहू योजना प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासींपर्यंत पोहोचविल्या/राबविल्या जातात. मेळघाटात २३ सिंचन तलाव असून त्यामध्ये पाण्याचा साठा होतो. विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत तीन सिंचन तलावाच्या दुरुस्तीच्या कामावर रु.२३.०६ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ता.भडगाव, जि.जळगाव येथील कजगाव ते भडगाव ह्या रस्त्याची दुरुस्तीबाबत**

**(४९) २७४१२ (३१-०७-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कजगाव ते भडगाव (ता.भडगाव, जि.जळगांव) तालुक्यातील या रस्त्याचे दुरुस्तीचे काम कोणताही निधी मंजूर नसतान सार्व.बांधकाम विभागामार्फत सुरु असल्याची माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, अंदाजपत्रकाविना दुरुस्ती काम करणा-या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) सदर रस्त्यावर १६ कि.मी. लांबीमध्ये खाजगी उद्योजकामार्फत सुधारणा करण्यात आली होती. दि.३०.६.२०१४ रोजी सदर प्रकल्प शासनाने ताब्यात घेतला आहे. सदर रस्त्याचे ८ किमी लांबीच्या दुरुस्तीचे काम सध्या निविदा रस्तरावर असून ऑक्टोबर, २०१५ मध्ये सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या साहित्याच्या**
**खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५०) २७७१७ (३१-०७-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य, वह्या इत्यादींचा पुरवठा निविदा पध्दतीचा वापर करुन खरेदी करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती व कोणत्या निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी कोणत्या निविदा मान्य करण्यात आल्या आहेत, तसेच त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती विहीत करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, उक्त साहित्याच्या खरेदीमध्ये झालेल्या नियमबाह्य बाबी व खरेदीमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन दिनांक ७ मे, २०१५ रोजी प्रधान सचिव, आदिवासी विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक अंतर्गत लेखन साहित्य, वह्या इत्यादींचा पुरवठयाकरिता संबंधित शासकिय आदिवासी आश्रमशाळेच्या मुख्याध्यापक स्तरावर दरपत्रके मागवून खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी शासकिय आश्रमशाळा तसेच वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना वह्या व इतर लेखन साहित्य पुरविण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदेबाबत अर्जदार श्री.राजेश नहार, पुणे यांनी दि.७/५/२०१५ रोजी प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग तसेच मा.मुख्यमंत्री यांनाही तक्रार दिली होती. सदर तक्रारीवर आयुक्त, आदिवासी विकास यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेवून वित्त विभागानेही चौकशी केली. वित्त विभागाच्या शिफारशींस अनुसरुन सदर निविदा रद्द करण्यात आली. यावर्षी मुख्याध्यापक/गृहपाल यांचे स्तरावर दरपत्रके मागवून मुलांना वह्या व इतर लेखन साहित्य देण्यासाठी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवही झालेली आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.